असा. क्र. ३६ रजिस्टर्ड नं. एमएच/एमबीआय-साऊथ/२०/९९

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

शनिवार, एप्रिल २४, १९९९/वैशाख ४, शके १९२१

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

अनुक्रमणिका

पृष्ठे

**सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.**—विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम .. ४०८–४१३

दिनांक २३ एप्रिल १९९९ रोजी राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी याद्वारे प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९.

[राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २४ एप्रिल १९९९ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.]

**विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करण्याकरिता; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** विवक्षित अत्यावश्यक सेवा आणि समाजातील नेहमीचे व्यवहार चालू ठेवण्याची तरतूद करणे; आणि त्याच्याशी संबंधित किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट होते;

**आणि ज्याअर्थी,** त्यासाठी तरतूद करण्याकरिता तात्काळ कायदा करणे आवश्यक होते;

**आणि ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते;

**आणि ज्याअर्थी,** उपरोक्त प्रयोजनांसाठी कायदा करण्याकरिता महाराष्ट्राच्या राज्यपालांनी त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल महाराष्ट्राच्या राज्यपालांची खात्री झाली होती; आणि म्हणून, त्यांनी दिनांक ९ मार्च १९९९ रोजी महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अध्यादेश, १९९९ प्रख्यापित केला होता; सन १९९९ चा महा. अध्या. ५.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या पन्नासाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती, प्रारंभ व कालावधी. १. (१) या अधिनियमास महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अधिनियम, १९९९ असे म्हणावे.

(२) तो संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) तो दिनांक ९ मार्च १९९९ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल आणि त्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, या अधिनियमाचे प्रवर्तन बंद होण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या गोष्टी वगळता तो अमलात असण्याचे बंद होईल, आणि या अधिनियमाचे प्रवर्तन बंद झाल्यावर तो जणू काही महाराष्ट्र अधिनियमाद्वारे त्या वेळी निरसित करण्यात आला होता असे समजून मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ चे कलम ७ लागू होईल. १९०४ चा मुंबई १.

व्याख्या. २. संदर्भानुसार अन्यथा अर्थ अपेक्षित नसेल तर या अधिनियमात,—

(अ) "अत्यावश्यक सेवा" म्हणजे,—

(एक) जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे, अशी, उतारू किंवा माल जमिनीवरून किंवा पाण्यावरून वाहून नेणारी कोणतीही परिवहन सेवा;

(दोन) जिच्या संबंधात राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशी, गॅस किंवा दूध किंवा पाणी किंवा वीज पुरवठा करण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा;

(तीन) रुग्णालये व दवाखाने यांच्यासह, सार्वजनिक आरोग्य व स्वच्छता राखण्याच्या संबंधातील कोणतीही सेवा;

(चार) राज्याच्या कामकाजाच्या संबंधातील कोणतीही सरकारी सेवा, पद आणि नोकरी आणि तसेच राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचाऱ्यांच्या पदांवर नियुक्त करण्यात आलेल्या व्यक्ती, आणि उच्च न्यायालयाचे अधिकारी व सेवक;

(पाच) स्थानिक प्राधिकरणांच्या कामकाजाशी संबंधित असलेली कोणतीही सेवा किंवा पद;

(सहा) ज्या बाबींसंबंधी राज्य विधानमंडळास कायदे करण्याचा अधिकार आहे अशा बाबींशी संबंधित असलेल्या ज्या कोणत्याही इतर सेवेतील किंवा नोकरीतील किंवा नोकऱ्यांच्या वर्गातील संपामुळे राज्य शासनाच्या मते, कोणतीही सार्वजनिक सुरक्षितता राखण्यास किंवा समाजजीवनास अत्यावश्यक असलेल्या, वस्तूंचा पुरवठा व सेवा चालू राहण्यास बाधा पोहोचेल किंवा समाजास गंभीर स्वरूपाच्या अडचणी येतील आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ राज्य शासन राजपत्रातील अधिसूचनेद्वारे जी अत्यावश्यक सेवा असल्याचे जाहीर करील अशी कोणतीही इतर सेवा, पद, नोकरी किंवा त्यांचा वर्ग;

(ब) "संप" म्हणजे, कोणत्याही अत्यावश्यक सेवेत कामावर लावलेल्या व्यक्तींच्या गटाने एकत्रितपणे काम बंद करणे किंवा अशा रीतीने ज्या व्यक्ती कामावर असतील किंवा ठेवलेल्या असतील अशा कितीही व्यक्तींनी काम चालू ठेवण्यास किंवा काम स्वीकारण्यास एकविचाराने किंवा एकमताने नकार देणे, आणि त्यात पुढील गोष्टींचा समावेश होईल :—

(एक) कोणतीही अत्यावश्यक सेवा चालू ठेवण्यासाठी अतिकालीक काम करणे आवश्यक असेल त्या बाबतीत असे काम करण्यास नकार देणे;

(दोन) कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील काम थांबवण्यात किंवा बऱ्याच प्रमाणात ते कमी होण्यास ज्या कोणत्याही इतर वर्तणुकीची परिणती होण्याचा संभव असेल किंवा होईल अशी कोणतीही इतर वर्तणूक;

१९४७ चा १४. (क) औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ मध्ये व्याख्या केलेले आणि कलमे ५ व ६ मध्ये वापरलेले परंतु व्याख्या न केलेले शब्द व शब्दप्रयोग यांना त्या अधिनियमामध्ये अनुक्रमे त्यात नेमून दिलेले अर्थ असतील.

१९९९ चा महा. ५.

प्रत्येक अधिसूचना राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवणे.

३. (१) कलम २ च्या खंड (अ) च्या उप-खंड (सहा) अन्वये काढण्यात आलेली प्रत्येक अधिसूचना, ती काढण्यात आल्यानंतर राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असेल तर तावडतोब व जर त्याचे अधिवेशन चालू नसेल तर सभागृहाच्या पुढील अधिवेशनाचा प्रारंभ होईल तेव्हा पहिल्या दिवशी त्याच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ती अशा रीतीने ठेवण्यात आल्याच्या तारखेपासून किंवा, यथास्थिति, राज्य विधानमंडळाची पुन्हा बैठक भरल्यापासून चाळीस दिवसांच्या समाप्तीनंतर, त्या मुदतीच्या समाप्तीपूर्वी ती अधिसूचना काढण्यास मान्यता देणारा ठराव राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी संमत केला नसेल तर अंमलात राहण्याचे बंद होईल.

(२) पोट-कलम (१) द्वारे किंवा तद्न्वये कोणतीही अधिसूचना अंमलात राहण्याचे बंद होईल तेव्हा त्या बाबतीत अशा रीतीने तिचा अंमल बंद होणे यामुळे अशा समाप्तीपूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीस बाधा येणार नाही.

१४ चा १.

**स्पष्टीकरण.**— राज्य विधानमंडळाच्या सभागृहांच्या बैठकी निरनिराळ्या तारखांना पुन्हा बोलाविण्यात आल्या असतील तर त्या तारखांपैकी जी उशिराची तारीख असेल त्या तारखेपासून ही चाळीस दिवसांची मुदत मोजण्यात येईल.

विवक्षित नोकऱ्यांमधील संपास मनाई करण्याचा अधिकार.

४. (१) कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील संपास मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, पोट-कलम (५) च्या तरतुदीस अधीन राहून सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार, त्या आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल -या तारखेपासून तसे करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे ज्यांच्यावर परिणाम होत असेल अशा व्यक्तींच्या निदर्शनास आणण्यासाठी राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने तो प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश त्यात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापासून फक्त सहा महिने अंमलात राहील, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, राज्य शासनास, तशाच रीतीने प्रसिद्ध केलेल्या तत्सम आदेशांद्वारे व पोट-कलम (५) च्या तरतुदींच्या अधीन राहून, त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या कोणत्याही मुदतीकरिता वाढविता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढण्यात आल्यानंतर,—

(अ) हा आदेश ज्या अत्यावश्यक सेवेस लागू होत असेल त्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेतील कोणत्याही व्यक्तीने संपावर जाता कामा नये किंवा संपावर राहता कामा नये ;

(ब) अशा सेवेत नोकरीस असलेल्या व्यक्तींनी तो आदेश काढण्यापूर्वी किंवा त्यानंतर जाहीर केलेला किंवा सुरू केलेला कोणताही संप अवैध ठरेल.

(५) (अ) विधानपरिषदेचा सभापती आणि विधानसभेचा अध्यक्ष यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करून, राज्य विधानमंडळाच्या सभागृहांच्या सचिवालयीन कर्मचारीवर्गामध्ये नियुक्त केलेल्या व्यक्तींच्या बाबतीत ;

(ब) उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश यांच्या विनंतीनुसार असेल ते खेरीज करून, उच्च न्यायालयाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत ;

पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये कोणताही आदेश काढता येणार नाही.

**विवक्षित आस्थापनांमधील टाळेबंदींना मनाई करण्याचा अधिकार.**

५. (१) आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही आस्थापनेतील टाळेबंदीला मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशानुसार तसे करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे ज्यांच्यावर परिणाम होत असेल अशा व्यक्तींच्या निदर्शनास आणण्यासाठी राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश फक्त सहा महिने अंमलात राहील, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास त्यास, तत्सम आदेशाद्वारे त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या मुदतीकरिता वाढविता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढण्यात आल्यानंतर,---

(अ) कोणत्याही मालकाला हा आदेश ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेच्या संबंधात कोणतीही टाळेबंदी जाहीर करता येणार नाही किंवा सुरू करता येणार नाही;

(ब) कोणत्याही मालकाने हा आदेश ज्या आस्थापनेला लागू होत असेल त्या आस्थापनेच्या संबंधात असलेली व हा आदेश काढण्यात येण्यापूर्वी किंवा त्यानंतर जाहीर केलेली किंवा सुरू केलेली कोणतीही टाळेबंदी अवैध ठरेल.

(५) कोणताही मालक, आस्थापनेच्या संबंधात, या कलमान्वये अवैध असणारी टाळेबंदी सुरू करील, चालू ठेवील किंवा अन्य प्रकारे तिच्या पुर:सरणार्थ वर्तणूक करील तर तो सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

**विवक्षित आस्थापनांमधील अपरिहार्य कामबंदीला मनाई करण्याचा अधिकार.**

६. (१) आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अत्यावश्यक सेवेशी संबंधित असलेल्या कोणत्याही आस्थापनेच्या हजेरीपटावर ज्याचे नाव आहे अशा कोणत्याही कामगाराच्या (बदली कामगार किंवा नैमित्तिक कामगार यांव्यतिरिक्त) अपरिहार्य कामबंदीला, वीज टंचाई किंवा नैसर्गिक आपत्ती यांव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणामुळे मनाई करणे लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे तसे मनाई करता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश, त्याच्यामुळे ज्यांच्यावर परिणाम होत असेल अशा व्यक्तींच्या निदर्शनास आणण्यासाठी राज्य शासनास जी रीत उत्तम वाटेल त्या रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये काढण्यात आलेला आदेश फक्त सहा महिने अंमलात राहील, परंतु लोकहिताच्या दृष्टीने तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे अशी राज्य शासनाची खात्री पटल्यास, त्यास, तत्सम आदेशाद्वारे त्याची मुदत सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल एवढ्या मुदती-करिता वाढविता येईल.

(४) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (३) अन्वये एखादा आदेश काढण्यात आल्यानंतर,---

(अ) कोणताही मालक आदेश लागू होणाऱ्या कोणत्याही आस्थापनेच्या संबंधात आस्थापनेच्या हजेरीपटावर ज्याचे नाव आहे अशा कोणत्याही कामगाराची (बदली कामगार किंवा नैमित्तिक कामगार यांव्यतिरिक्त) अपरिहार्य कामबंदी---अशी कामबंदी वीज टंचाईमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे नसेल तर---करणार नाही किंवा चालू ठेवणार नाही आणि अशी कोणतीही अपरिहार्य कामबंदी वीज टंचाईमुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे करण्यात किंवा चालू ठेवण्यात आली नसेल तर अशी अपरिहार्य कामबंदी करणे किंवा ती चालू ठेवणे अवैध ठरेल ;

(ब) खंड (अ) खाली ज्या कामगारांची अपरिहार्य कामबंदी अवैध असेल, त्याला, जणू काही त्याच्यावर अशी अपरिहार्य कामबंदी लादण्यात आली नव्हती असे मानून त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याअन्वयेचे सर्व लाभ मिळण्याचा हक्क असेल.

(५) आस्थापनेच्या संबंधात कोणत्याही कामगारांची कामबंदी करणारा किंवा चालू ठेवणारा कोणताही मालक, अशी अपरिहार्य कामबंदी करणे किंवा चालू ठेवणे हे या कलमाअन्वये अवैध असेल तर, सहा महिन्यांच्या मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाच्या शिक्षेस किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाच्या शिक्षेस किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र ठरेल.

बेकायदेशीर संपाबद्दल शास्ती.

७. या अधिनियमाअन्वये बेकायदेशीर असलेला संप सुरू करणाऱ्या किंवा अशा कोणत्याही बेकायदेशीर संपावर जाणाऱ्या किंवा राहणाऱ्या किंवा अन्य प्रकारे संपात भाग घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस दोषसिद्धीनंतर सहा महिने मुदतीपर्यंत असू शकेल एवढ्या कारावासाची किंवा दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

चिथावणी देण्याबद्दल शास्ती.

८. या अधिनियमाअन्वये जो बेकायदेशीर असेल अशा संपास चिथावणी देणाऱ्या, त्यात भाग घेण्यास इतर व्यक्तींना उद्युक्त करणाऱ्या किंवा अन्य प्रकारे त्याच्या पुर:सरणार्थ वागणाऱ्या वगैरे कोणत्याही व्यक्तीस, दोषसिद्धीनंतर एक वर्ष मुदतीपर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

बेकायदेशीर संपांना वित्तीय सहाय्य देण्याबद्दल शास्ती.

९. या अधिनियमाअन्वये बेकायदेशीर असलेल्या संपाच्या पुर:सरणार्थ किंवा त्यास पाठिंबा देण्यासाठी जाणूनबुजून जी व्यक्ती कोणताही पैसा खर्च करील किंवा पुरवील तिला, दोषसिद्धीनंतर एक वर्ष मुदती-पर्यंत असू शकेल इतक्या कारावासाची किंवा एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल एवढ्या दंडाची शिक्षा दिली जाईल किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील.

शिस्तभंगाच्या कारवाई-खेरीज कलमे ७, ८ किंवा ९ अन्वये करण्यात येणारी कारवाई.

१०. कोणतीही व्यक्ती, तिच्या सेवेच्या किंवा नोकरीच्या अटी व शर्तींमुळे शिस्तभंगाच्या स्वरूपातील ज्या कोणत्याही कारवाईला किंवा तिच्या अनुषंगाने होणाऱ्या ज्या कोणत्याही परिणामाला उत्तरदायी होईल त्या कारवाईला किंवा परिणामाला कलमे ७, ८ किंवा ९ यांअन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही कारवाईमुळे बाधा पोहोचणार नाही व ती त्यांना अतिरिक्त म्हणून राहील.

अधिपत्रा-शिवाय (वॉरंट) अटक करण्याचा अधिकार व अपराध जामीनयोग्य नसणे.

ा २. ११. (१) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखालील कोणताही अपराध, एखाद्या व्यक्तीने केला आहे असा जिच्याबाबत सकारण संशय वाटत असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास अधिपत्राशिवाय (वॉरंट) अटक करता येईल.

(२) या अधिनियमाखालील सर्व अपराध जामीनयोग्य नसतील.

अधिनियम इतर कायद्यांवर अधिभावी असणे.

१२. मुंबई औद्योगिक संबंध अधिनियम, १९४६, औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा यात या अधिनियमाच्या किंवा तदन्वये काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या तरतुदींशी विसंगत अशी गोष्ट अंतर्भूत असली तरीही ह्या तरतुदी प्रभावी राहतील. १९४७ चा मुंबई ११. १९४७ चा १४.

सन १९९९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ चे निरसन व व्यावृत्ती.

१३. (१) महाराष्ट्र अत्यावश्यक सेवा परिरक्षण अध्यादेश, १९९९ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. १९९९ चा महा. अध्या. ५.

(२) आशाप्रकारे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशान्वये केलेली कोणतीही कृती किंवा कोणतीही कार्यवाहि (काढलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यासह) ही या अधिनियमाच्या तत्सम तरतुदींन्वये यथास्थिति करण्यात आलेली कृती, कार्यवाही किंवा काढण्यात आलेली अधिसूचना असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.